# रियाज करा; पण सीडीच्या मदतीने!

**पुणे, ता. १९ :** अनेकांना इच्छा असूनही शास्त्रीय संगीताचे प्राथमिक शिक्षण घेता येत नाही, किंवा शास्त्रीय संगीत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना रियाजासाठी तंबोरा किंवा तबला उपलब्ध होत नाही. ही गरज ओळखून सांगलीतील चैतन्य मल्टिमीडिया या संस्थेने रियाजाला साथ देणाऱ्या आणि एमपीथ्री आणि डीव्हीडी माध्यमातूनही मदत करणाऱ्या सीडी सादर केल्या आहेत.



डॉ. बाळकृष्ण चैतन्य



सध्या वेगवेगळ्या प्रकारच्या सीडीज बाजारात उपलब्ध आहेत. मात्र, घरच्या रियाजाला अशा प्रकारे साथ देणाऱ्या पहिल्याच सीडी आहेत. शास्त्रीय संगीताच्या शिक्षणात रियाजाला अतिशय महत्त्व असते. मात्र, अनेकांना साथीची वाद्ये घेऊन रियाज परवडत नाही, किंवा हवे तेव्हा वादक उपलब्ध होतीलच असे नाही. त्यामुळे मूडप्रमाणे अभ्यास आणि रियाज करणे शक्य होत नाही. अशा वेळी या आगळ्यावेगळ्या आणि कधीही साथीच्या सेवेला हजर होणाऱ्या सीडी उपयोगी पडतात.

संगीताचे प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांसाठीही उपयुक्त सीडीज 'चैतन्य'ने सादर केल्या आहेत. रियाज सरगम, रियाज रागसरगम, रियाज रागमालिका आणि रियाज ताल परिचय या सीडी मार्गदर्शनासाठी असून, रियाज तानपुरा आणि रियाज स्वरताल या सीडी साथीसाठी आहेत. सध्याच्या बाजारपेठेची गरज लक्षात घेऊन रियाझ तानपुरा साथी आणि रियाझ तबला साथी या सीडी एमपी थ्री आणि डीव्हीडी माध्यमातही सादर करण्यात आल्या आहेत.

डॉ. बाळकृष्ण चैतन्य यांनी या सीडी तयार केल्या आहेत. ते स्वतः व्यवसायाने डेंटिस्ट आहेत, मात्र शास्त्रीय संगीतात त्यांना विशेष रुची आहे. जवळजवळ पंधरा वर्षे त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले आहे. सुमारे तीन वर्षे संशोधन करून त्यांनी या सीडी बाजारात आणल्या आहेत. अधिक माहितीसाठी (०२३३) ३२९२८२० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू रियाझमाला डॉट कॉम या वेबसाइटवर संपर्क साधावा.